जनसंपर्क कक्ष

27 MAY 2018 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**देवानंद शिंदे : विद्यापीठात पंचवार्षिक बृहत् आराखडा कार्यशाळा**

# शैक्षणिक गुणवत्ता निर्माण करण्याची जबाबदारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जागतिक दर्जाची विद्यापीठे आपल्याकडे येत आहेत. ओघाने स्पर्धात्मक स्वरुपात वाढ होणार आहे. त्याअनुषंगाने शैक्षणिक गुणवत्ता निर्माण करण्याची जबाबदारी आपल्यावर येत आहे. बृहत् आराखडा शैक्षणिक विकासाच्या वाटचालीचा आरसा असतो. निश्चितपणे हे लक्ष्य आराखड्यामध्ये प्रतिबिंबित झाले पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार शिवाजी विद्यापीठ आणि सोलापूर विद्यापीठ यांच्याकरिता शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीचा पंचवार्षिक बृहत् आराखडा तयार करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यासाठी आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

यावेळी, पुढील पाच वर्षांकरिता विद्यापीठाच्या विकासाचा दृष्टिकोन कसा असावा, याचे विस्तृत मार्गदर्शन विद्यापीठाचे माजी कुलगुरु व महाराष्ट्र शासन नियुक्त बृहत् आराखडा समिती सदस्य डॉ. एन. जे. पवार यांनी केले. प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांनी आभार मानले.

यावेळी डॉ. बी. एन. जगताप, प्राचार्य अनिल राव, डॉ. मिलिंद सोहानी, विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह शिवाजी विद्यापीठ व सोलापूर विद्यापीठातील अधिकारी आदींची उपस्थिती होती.



शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये शनिवारी शिवाजी विद्यापीठ आणि सोलापूर विद्यापीठ यांच्याकरिता पंचवार्षिक बृहत् आराखडा तयार करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन कार्यशाळेत कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी मार्गदर्शन केले. शेजारी मान्यवर उपस्थित होते.

## सर्वसमावेशक भूमिकेद्वारे आराखडा तयार

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, बृहत् आराखडा सर्वसमावेशक होण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने जिल्हानिहाय समिती निर्माण केल्या आहेत. यामध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, संस्थाचालक, लोकप्रतिनिधी, जिल्हा उद्योग प्रतिनिधी, अधिकार मंडळांचे सदस्य या सर्वांची समावेशक भूमिका घेऊन हा आराखडा तयार केला आहे.

27 MAY 2018 **तरुण भारत**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा जैन इन्स्टिट्यूट रिसर्चशी करार

## विद्यापीठाच्या विविध योजना, उपक्रम राबविणार : व्यावसायिक अभ्यासक्रमांना चालना

प्रतिनिधी
कोल्हापूर

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी आणि शिक्षकांचीही क्षमता वाढावी यासाठी शिवाजी विद्यापीठाचा एस. पी. जैन इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च या संस्थेशी सामंजस्य करार झाला. या कराराच्या माध्यमातून विद्यापीठाने हाती घेतलेल्या वेगवेगळया उपक्रमांना चालना मिळणार आहे.

शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या उपस्थितीत कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे व एस. पी. जैन इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्चच्या मार्केटिंग विभागाचे डीन डॉ. रंजन बॅनर्जी यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. राज्यातील खासगी आणि सार्वजनिक विद्यापीठात झालेला हा पहिला करार आहे. या सामंजस्य करारा अंतर्गत एम. बी. ए अधिविभागासह सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी



**कोल्हापूर : शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, डॉ. रंजन बॅनर्जी, डॉ. एच. एम. ठकार, डॉ. जयदिप बागी, डॉ. कविता ओझा, डॉ. दिपा इंगवले, डॉ. नितीन माळी.**

महत्त्वपूर्ण योजना राबविल्या जातील. यामध्ये फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामस्, हेल्प इन केस रायटींग, इम्प्रुव्हींग रिसर्च कॅपॅबिलिटी ऑफ फॅकल्टी, कोलॅबोरेटीव्ह पीएच. डी. प्रोग्राम, इम्प्रु स्टुडंट आउटकम्स्, क्युरिक्युलम रिव्हीजन, कौन्सिलिंग द लिडरशिप, रिसर्च अँड कंसल्टींग ऑन सिलेक्टेड सोशल इनिशिएटीव्हस् ऑफ द गर्व्हनमेंट ऑफ महाराष्ट्र दॅट आर रेलेव्हंट टू दी कोल्हापूर रिजन, ऐनी अदर एरियाज ऑफ म्युचअल इंटरेस्ट रिक्वॉयरिंग अपग्रेडेशन आदी योजनांचा समावेश आहे.

यावेळी डॉ. एच. एम. ठकार, डॉ. जयदिप बागी, डॉ. कविता ओझा, डॉ. दिपा इंगवले, डॉ. नितीन माळी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 MAY 2018
तरुण भारत

# विद्यापीठ प्रवेश पूर्व परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विद्यापीठ व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयाची शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठीची ऑनलाईन प्रवेश पूर्व परीक्षा तिन्ही जिल्ह्यातील २४ परीक्षा केंद्रात सुरळीत पार पडली. या परीक्षेला तिन्ही जिल्ह्यातून १ हजार ५३८ विद्यार्थ्यांपैकी १ हजार ३७३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर १६५ विद्यार्थी गैरहजर होते, अशी माहिती परीक्षा विभागातर्फे देण्यात आली.

विद्यापीठ परिक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा या तिन्ही जिल्हयात तीन सत्रात ही परीक्षा झाली. यामध्ये डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी (कसबा बावडा, कोल्हापूर), भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (मोरेवाडी, कोल्हापूर), डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग(जयसिंगपूर, कोल्हापूर), डॉ. दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (बनवाडी, ता. कराड, जि. सातारा), कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड पॉलीटेक्नीक (सीएएमपी, सातारा), कोल्हापूर इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (करवीर, कोल्हापूर), राजारामबापू इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी(राजाराम नगर, साखराळे, ता. वाळवा, जि. सांगली),तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी (वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर), अंबाबाई तालीम संस्था संजय भोकरे कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी (मिरज), डिपार्टमेंट ऑफ कॉम्प्युटर सायन्स (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), यासह अन्य परीक्षा केंद्राचा समावेश आहे.

27 MAY 2018

लोकमत

# १,३७३ जणांनी दिली प्रवेश परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : एम.एस्सी.च्या स्टॅटिस्टिक्स, अॅप्लाईड स्टॅटिस्टिक अँड इन्फर्मेशन, बॉटनी, कॉम्प्युटर सायन्स या चार विषयांची प्रवेश परीक्षा शनिवारी ऑनलाईन पद्धतीने घेतली. १ हजार ५३८ जणांनी प्रवेश अर्ज दाखल केला होते. त्यापैकी १ हजार ३७३ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली; तर १६५ जण गैरहजर राहिले.

सोमवारी (दि. २८) एम. एस्सी. एन्व्हायर्न्मेंटल सायन्स, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एम. एस्सी. टेक. (रुरल टेक्नॉलॉजी), एमबीएकरिता, मंगळवारी (दि. २९) एमआरएस, एमएसडब्ल्यूसाठी परीक्षा होणार आहे.

27 MAY 2018
Times of India

# Workshop on SUK perspective plan held

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** A state-level one-day perspective plan workshop was held at Shivaji University, Kolhapur (SUK) on Saturday.

D T Shirke, pro-vice-chancellor (VC) of SUK said that members— K B Patil, Anil Rao, former SUK VC N J Pawar and B N Jagtap were present for meeting. They guided the participants on the overall template of the perspective plan to be submitted to the state government. The inputs from experts are helpful for preparing the 2019-20 to 2023-24 perspective plan.

Shirke said, "We had submitted our five-year perspective plan last year. However the government added a few suggestions and asked us to submit the plan once again. The new perspective plan has to be submitted by July 31."

SUK VC Devanand Shinde said that the workshop is necessary for awareness as well as for the creation of proper perspective plan.

He said, "This remains an opportunity for all of us and our goals should be reflected in the plan."

Shinde added, "We are trying to inculcate what is not there in the present syllabus. Courses such as creative writing, criminology and cybersecurity will be path-breaking for our university. We are looking for an inclusive policy in our perspective plan. It will help to create a better foundation for students."

27 MAY 2018 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्षमता ओळखा, करिअर घडवा : कुलगुरू

## ‘एज्यु-दिशा २०१८’ प्रदर्शनाला प्रारंभ; मनाला पटते तेच करा : घोडावत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

क्षमता ओळखा आणि त्यानुसारच करिअर घडवा, असा मूलमंत्र शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शनिवारी विद्यार्थ्यांना दिला. संजय घोडावत विद्यापीठ प्रस्तूत दैनिक ‘पुढारी’ आयोजित ‘एज्यु-दिशा’ प्रदर्शनाचे शनिवारी त्यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी संजय घोडावत विद्यापीठाचे प्रेसिडेंट संजय घोडावत प्रमुख उपस्थित होते. तुमच्या मनाला जे पटते तेच करा, दबावाखाली काही करू नका, असा सल्ला घोडावत यांनी विद्यार्थ्यांना दिला.

‘एज्यु-दिशा’ पॉवर्ड बाय पिंपरी चिंचवड एज्यूकेशन ट्रस्ट व नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ, पुणे असून सहयोगी प्रायोजक विश्वकर्मा विद्यापीठ, सहप्रायोजक चाटे ग्रुप ऑफ एज्युकेशन्स, मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे व सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट असलेले हे प्रदर्शन राजारामपुरी येथील व्ही.टी. पाटील सभागृहात सोमवार (दि.२८) पर्यंत दररोज सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत सुरू राहणार आहे. पहिल्याच दिवशी या प्रदर्शनाला विद्यार्थी व पालकांनी गर्दी केली होती.

तुमच्या अपेक्षा मुलांनी पूर्ण कराव्यात, असा आग्रह धरू नका, असे पालकांना आवाहन करत कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, मुलांची क्षमता समजून घ्या, त्यांच्याशी चर्चा करा, त्याची क्षमता अधिक वृद्धिंगत कशी करता येईल, त्यासाठी त्याला मदत करा. मुलांमधील क्षमता वाढली नाही, तर अपेक्षित यश मिळूनही काही दिवसांनंतर त्यात अपयश वाढत जाण्याची भीती असते.

डॉ. शिंदे म्हणाले, पद व पैसा या गोष्टी मेडिकल आणि इंजिनिअरिंगपेक्षा अनेक क्षेत्रातही असतात. त्याकरिता जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक ठेवा. विद्यार्थ्याला विचार करू द्या. भविष्य कसे घडेल हे लगेच सांगता येत नाही. लहानपणी केवळ रेषा ओढणारा मुलगा भविष्यात एखादा महान चित्रकारही होऊ शकतो. अशी अनेक उदाहरणे आपल्या अवती-भवती असतात. यामुळे आपली स्वप्ने त्याच्यावर लादू नका, त्याला जे करावेसे वाटते, ज्यासाठीची क्षमता त्याच्यात आहेत, ज्या क्षेत्रात तो चांगले काही करेल अशी स्थिती आहे, त्यानुसारच त्याला करू द्या, असे आवाहनही त्यांनी पालकांना केले.

‘आऊट ऑफ बॉक्स’ विचार करा, असे सांगत डॉ. शिंदे म्हणाले, तुमची किंमत ही तुमच्या कौशल्यावर ठरत आहे. सध्या तंत्रज्ञानाचे युग आहे. या जगात तुम्ही जन्मला आहात, त्याचा वापर केला पाहिजे. केवळ ‘वॉटस्‌अप’ वापरले म्हणजे तंत्रज्ञानाचा वापर झाला असे होत नाही. करिअरसाठी अनेक क्षेत्रे आहेत. अन्न, औषध यासारख्या क्षेत्रात तर चिरतंन संधी आहेत. करिअरसाठी कोणत्या संधी आहेत, त्या क्षेत्रांची, त्यासाठी आवश्यक अभ्यासक्रम शिकवणाऱ्या संस्थांची सर्व माहिती ‘एज्यू-दिशा’ प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना मिळेल असे सांगत विद्यार्थ्यांचे करिअर घडवण्यासाठी ‘पुढारी’च्या वतीने गेली आठ वर्षे भरवले जात असलेले हे प्रदर्शन मार्गदर्शक ठरत असल्याचे गौरवोद्‌गार त्यांनी काढले.

संजय घोडावत विद्यापीठाचे प्रेसिडंट संजय घोडावत म्हणाले, विद्यार्थ्यांना नवी क्षेत्रे निवडा असे सांगतो पण त्यासाठीचे पर्याय देत नाही. कोल्हापूर-सांगली जिल्ह्यातून वर्षाला जवळपास ५ हजार कोटी रुपयांचा कर सरकारला दिला जातो. पण आजही कोल्हापूर-सांगली या मार्गावर प्रवास करण्यासाठी दीड तास लागतात. याउलट चीनसारख्या देशात ४०० किलोमीटरचे अंतर दोन अडीच तासात पार होते. आपण मुलभूत सुविधा देत नाही. या पायाभूत सुविधांचा विकास झाला, तर अनेक क्षेत्रात कामाची संधी मिळणार आहे. भारत हा तरुणांचा देश आहे, या तरुण शक्तीचा वापर केला तर आपण खुप पुढे जाऊ, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

केवळ नोकरीच्या मागे लागू नका, आवड असेल तर छोटे छोटे व्यवसाय सुरू करा, असे सांगत घोडावत म्हणाले, कोणताही व्यवसाय करण्यासाठी, त्यात यशस्वी होण्यासाठी वयाचा अडसर येत नाही. तुमच्या मनाला जे पटते ते करा, कोणतीही गोष्ट फोर्सनि करू नका. पण जे करणार ते समजावून सांगा, आई-वडील आणि गुरूजनांचा आदर करा. शिक्षणापेक्षाही संस्कार महत्त्वाचे असतात हे नेहमी लक्षात ठेवा आणि संस्कार कधीही विसरू नका.जे करणार त्याचे काहीतरी ध्येय निश्चित करा, त्यासाठी सातत्याने प्रयत्न करत रहा असेही त्यांनी सांगितले. ‘हार्ड वर्क’,‘स्मार्ट वर्क’, ‘डेलीकेट’ आणि ‘डिव्होशन’ ही चार चाके आहेत. ‘डिस्पेलिन’ आणि ‘क्लिननेस’ ही स्टेपनी आहे. ‘व्हिजन आणि ॲक्शन’ हे स्टेअरिंग आहे. या सर्वांचा वापर करून योग्य वेळी ‘गिअर चेंज’ करता आला पाहिजे, असा यशस्वी होण्याचा मूलमंत्रही त्यांनी दिला.

शेतात काय पिकते, यापेक्षा बाजारात काय विकते, हे जो जाणतो तो यशस्वी होतो असे सांगत घोडावत म्हणाले, जगाला काय हवे आहे ते देण्याचा प्रयत्न आमच्या संस्थेतून केला जात आहे. २०१० मध्ये केवळ ६० विद्यार्थ्यांवर संस्था सुरू केली होती. त्यावेळी पालकांनी फी परत मागण्याचाही प्रयत्न केला. पण आम्ही त्यांना विनंती केली. आमचे ध्येय होते, त्यादृष्टीने प्रयत्न केला आणि आज या संस्थेत १६ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. भविष्यात कशाची गरज आहे हे ओळखून त्यादृष्टीने विद्यार्थ्यांना अधिक सक्षम करणारे अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. या संस्थेच्या देशभर शाखा सुरू करण्यात येणार आहे त्यासह केजी टू पीजी लर्निंग देणारे घोडावत विद्यापीठाचे ॲपही तयार करण्यात येत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. दैनिक ‘पुढारी’चे समुह सरव्यवस्थापक अनिल पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. मान्यवरांनी प्रदर्शनात सहभागी झालेल्या स्टॉलना भेट देऊन विविध संस्थांची माहिती घेतली.

यावेळी संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. व्ही. ए. रायकर, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या सेंट्रल ट्रेनिंग अ‍ॅन्ड प्लेसमेंट सेलचे अधिष्ठाता प्रा. शीतलकुमार रवंदळे, विश्वकर्मा विद्यापीठाचे डीन डॉ. सुनील डोके, चाटे ग्रुप ऑफ एज्युकेशन्सचे संचालक प्रा.भरत खराटे, मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या प्रा. प्रीती जोशी, सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे सुनील धनगर, दै. ‘पुढारी’चे समूह कार्यकारी संपादक सुरेश पवार, सहायक सरव्यवस्थापक राजेंद्र मांडवकर, विभागीय जाहिरात व्यवस्थापक शशिकांत पोवार आदी उपस्थित होते.



कोल्हापूर: ‘एज्यु-दिशा’ या प्रदर्शनाचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत उद्योगपती संजय घोडावत, कुलगुरू प्रा. डॉ. व्ही. ए. रायकर, प्रा. शीतलकुमार रवंदळे, डॉ. सुनील डोके, प्रा.भरत खराटे, प्रा. प्रीती जोशी, सुनील धनगर, दै. ‘पुढारी’चे समूह सरव्यवस्थापक अनिल पाटील आदी. (छाया : पप्पू अत्तार)

